# ॥ आत्मा मालिक ॥

श्रावण महोत्सव निमित्त

हार्दिक शुभेच्छा!



रक्षाबंधन निमित्त

हार्दिक शुभेच्छा!

**ध्यान म्हणजे निःशब्द ज्ञानाचा अभ्यास**

**निःशब्द ज्ञान म्हणजे आत्मज्ञान**

आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक
॥ॐ गुरुदेव॥

# आत्मा मालिक

ऑगस्ट-२०२४

## ।। सबका मालिक आत्मा ।।



# ।। अमृतवाणी ।।

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, ह्रदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व-रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्‌गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

## ।। आत्मा मालिक ।।

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

# मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २३ वे अंक ८ वा ऑगस्ट २०२४ ● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**

कुमार पाटील, मो. ९९२२२२८६५५
विलास गायकवाड, मो. ९९२२१७४२११

**जनसंपर्क**

पराग धुमाळ (ध्यान योग मिशन कार्यालय)
मो. ७५८८६९४०८४, ८३८००३९३०५

संपादकीय - अध्यात्माची अनिवार्यता - संत परमानंद महाराज ४

स्वदेहातल्या देवाला प्रसन्न करणे सोपे -डॉ. विजय बाणकर ६

हरिपाठाच्या गाभाऱ्यात (भाग ४) - नामदेव सदावर्ते १०

आंतु बाहेरी सर्वांपासी। -बंडोपंत कुलकर्णी १६

हे का भक्तीचे उपकार? - डॉ. सुनील शिंदे १९

गुरुपौर्णिमा महोत्सव २०२४ -बी. के. गायकवाड २२

मित्रता -नीता यादव २५

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## संपादकीय

## अध्यात्माची अनिवार्यता

**जीवनात आध्यात्मिक आणि भौतिक जीवन या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक आहेत. जीवनातील भौतिक बार्बीना जर दुधाची उपमा दिली, तर आध्यात्मिकतेला साखरेची उपमा द्यावी लागेल. या दोन्हींच्या मिश्रणाने सर्वसामान्य संसारी जीवांच्या जीवनात परिपूर्णता येते. आध्यात्मिक ज्ञान, त्याचा अवलंब यामुळे जीवनात मधुरता येते. आपण जीवनातील फक्त भौतिक गोष्टींनाच महत्त्व दिले तर त्यातून आपल्याला केवळ दुःखच प्राप्त होईल. जे फक्त सांसारिक सुखाची अपेक्षा करतात, त्यांना दुःख भोगण्यासाठी तयार रहावे लागते.**

**-संत परमानंद महाराज**

**जी**वनात अध्यात्म असणे आजच्या काळाची अनिवार्यता आहे. अर्थात ती प्रत्येक काळाची गरज होतीच. परंतु, आजच्या धावपळीच्या युगात अध्यात्मामुळे माणसाला या जन्माचे महत्त्व कळते. हा जन्म किती अनमोल आहे आणि आपण भौतिक सुख-साधने मिळविण्यासाठी तो कसा वाया घालवतो आहोत, हे आध्यात्मिक जीवनशैली अनुसरल्यास आपल्याला समजते. आध्यात्मिकतेचा अवलंब केला तर आपले जीवन आनंदमय होईल. आपल्या अवतीभोवती असलेल्या भौतिक संसाधनांचा वापर करणे, पैसा, पद, प्रतिष्ठा या सर्व गोष्टी मिळाल्या की सर्व सुख मिळाले असे आपणास वाटते. परंतु, हे खरे सुख नाहीच. कारण, हे सुख कितीही मिळविले तरी आपली इच्छापूर्ती होत नाही. उलट ती वाढतच जाते.

जीवनात आध्यात्मिक आणि भौतिक जीवन या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक आहेत. जीवनातील भौतिक बार्बीना जर दुधाची उपमा दिली, तर आध्यात्मिकतेला साखरेची उपमा द्यावी लागेल. या दोन्हींच्या मिश्रणाने सर्वसामान्य संसारी जीवांच्या जीवनात परिपूर्णता येते. आध्यात्मिक ज्ञान, त्याचा अवलंब यामुळे जीवनात मधुरता येते. आपण जीवनातील फक्त भौतिक गोष्टींनाच महत्त्व दिले तर त्यातून आपल्याला केवळ दुःखच प्राप्त होईल. जे फक्त सांसारिक सुखाची अपेक्षा करतात, त्यांना दुःख भोगण्यासाठी तयार रहावे लागते. कारण, कोणत्याही गोष्टीच्या दोन बाजू असतातच. एखाद्या गोष्टीपासून सुख मिळत असेल तर तिच्यापासून कालांतराने मिळणारे दुःखही भोगण्याची आपण मानसिक तयारी ठेवली पाहिजे. भौतिक संसाधने भरपूर मिळाली आणि कालांतराने त्यांचा विरह झाला तर मनुष्य खचून जातो, नाउमेद होतो. अशा काळात त्याला अध्यात्मच या मानसिक स्थितीमधून वर काढू शकते. जीवनाचा खरा अर्थ पटवून देऊ शकते. सांसारिक बाजू नेहमी आपल्याला त्रस्त करील, आपल्याला दुःख देईल. मात्र, याचा अर्थ असा नव्हे की त्यामुळे सगळ्यांनीच संसाराचा त्याग करून संन्यस्त जीवन स्वीकारावे. संसारात राहूनही आध्यात्मिक जीवनाचा आपण अवलंब करू शकतो. जीवनात अध्यात्मरुपी अमृत असेल तर संसारसागराच्या मंथनातून निघालेले विष पचविण्याची क्षमता आपल्या अंगी येते.

आपल्या जवळचे असल्याचा दावा करणारे नातेवाईकही वास्तविक आपले नसतात. आपला देह

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

हेच एक विश्व आहे, आणि त्यातील आत्मा हा एकमेव आपला परिवार, आप्तेष्ट, नातेवाईक आहे. आपल्यापासून सांसारिक, मानसिक सुख मिळते तोपर्यंत आपल्या जवळचे लोक आपले असतात. आपल्याकडून सुख मिळणे बंद झाले की सगळे आपल्याकडे पाठ फिरवतात. एखादा आजार होतो, अपघात होतो तेव्हा परिवार आपल्या जवळ असला तरी त्यापासून होणाऱ्या वेदना, त्याचे भविष्यातील परिणाम केवळ आपल्याला भोगावे लागतात. ते कोणीही वाटून घेऊ शकत नाही. इतर लोक मानसिक आधार देऊ शकतात, सांत्वन करू शकतात. परंतु, प्रत्यक्ष त्याचे दुःख केवळ आपल्यालाच भोगावे लागते. त्यामुळे आत्मा हाच एकमेव या शरीराचा सखा आहे, मित्र आहे, मालक आहे. आत्मा आहे तर हे शरीर आहे. आत्मा नसेल तर दुसऱ्या क्षणापासून हे मौल्यवान शरीर मातीमोल होईल. त्याचे विघटन होण्यास सुरुवात होईल. आपण आपल्या आत्म्यावर प्रेम करण्यास शिकलो तर इतरांवरही आपसूकच प्रेम करू. आपण भौतिक साधनांमुळे, सुखांमुळे परिवार, नातेवाईकांवर प्रेम करीत असू, तर ही साधने, सुख संपल्यानंतर आपल्या प्रेमातही अंतर पडू शकते. परंतु, जेव्हा आत्मा हा एकमेव आपला सखा असून, इतर भौतिक संसाधने, इतरांची आपल्याप्रति असलेली वागणूक ही केवळ भौतिक सुखांसाठी असल्याच्या सत्याचे आपल्याला ज्ञान होते. खरे सुख हे केवळ अध्यात्मातच असल्याचे सत्य जाणल्यानंतर आपण इतरांकडून असलेल्या भौतिक, मानसिक, शारीरिक आशा-अपेक्षांपासून आपण आपोआपच दूर जातो. साहजिकच, आपल्या मनात सर्वांविषयी स्वार्थी नव्हे, तर निरपेक्ष, विशुद्ध प्रेम निर्माण होते, जे भौतिक सुख-साधनांची कमतरता, वाद विवाद यामुळे कमी होत नाही.

त्यामुळे आत्म्याला जाणून घेणे हे प्रत्येक जीवाच्या जीवनाचे आदिकर्तव्य आहे. आत्म्याला जाणण्यासाठी सद्गुरूची आवश्यकता असते. सद्गुरू आपल्या आत दडलेल्या या आत्मरुपी परमात्म्याची आपणास जाणीव करून देतात. त्याच्यावर प्रेम करण्याची कला शिकवतात. एकदा का आपण आत्म्यावर प्रेम करण्याची कला आत्मसात केली की मग संसारी गोष्टींचा आपणावर फारसा परिणाम होणार नाही. आपण या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन परमात्मप्राप्तीच्या मार्गावर वाटचाल करण्यास सुरुवात करू. आत्म्याची प्राप्ती करण्याचा, त्यावर प्रेम करण्याचा, त्याला जाणून घेण्याचा एकमेव मार्ग आहे ध्यान, आत्मचिंतन. सद्गुरुंना आपल्या हृदयकमलात पाहून त्यांचे ध्यान केल्यास आपल्याला आत्मप्राप्तीचा राजमार्ग गवसेल आणि आपण या संसारसागरातून तरून आपल्या जीवनाचे अंतिम ध्येय, जे परमात्माप्राप्ती आहे, ते गाठू शकू. याद्वारेच आपण या जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होऊन या मानव जन्माचे सार्थक करू शकू. त्यासाठी ध्यान करा, ध्यानी बना.

**||आत्मा मालिक ||**

-संत परमानंद महाराज,
संपादक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## स्वदेहातल्या देवाला प्रसन्न करणे सोपे

दगडाधातूपासून तयार केलेल्या जड मूर्तिमधील देवताभाव प्रगट होणे हे खरे तर महाकठीणच असते. म्हणूनच चेतन असलेल्या ब्रह्मनिष्ठ गुरूंच्या ठिकाणीच भक्तिभाव ठेवणे, तेच चेतन स्वरूप असलेले साक्षात देव आहेत असे समजून घेणे, हे सुलभ व सोपे असते. स्वतः देवानेही, माझी प्राप्ती होते म्हणजे नेमके काय ते समजून देण्याघेण्यासाठीच गुरूशिष्य-परंपरा सुरू झाली आहे, असे श्रीज्ञानदेवांच्या मुखातून सांगितले आहे. दगडाधातूच्या मूर्तितील देवभावापेक्षा आपल्या स्वतःच्या हृदयात देव आहे, हे सत्य कळत असो वा नसो, पण तोच देव सर्वांना सदासर्वदा सुलभ असतो.

-डॉ. विजय बाणकर

संत श्रीनामदेव लहान होते तेव्हा त्यांच्या घरातील देवमूर्तिपुढे नैवेद्य ठेवावयास ते गेले होते. आपल्या आईवडिलांनी दिलेला नैवेद्य देव रोज खात असतो, अशी त्यावेळी त्यांच्या बालमनाची समजूत होती. म्हणून मुर्तिपुढे ठेवलेला नैवेद्य देव घेऊन खाईल म्हणून ते वाट पहात राहतात. नैवेद्य खा म्हणून देवाला आग्रह देखील करतात आणि शेवटी, तो नैवेद्य खात नाही म्हणून ते मूर्तिपुढे गळफास घेऊन जीव देऊ लागतात. त्यांचा तो सद्भाव पाहून देव प्रगट होतो व त्यांनी दिलेला नैवेद्य खातो. नंतर रिकामी वाटी घेऊन ते आईकडे जातात. नाम्याने स्वतःच नैवेद्य खाल्ला असणार आणि देवाने खाल्ला असे सांगतो, असे त्यांची आई म्हणते. त्यांचे वडीलही 'देवाने कधीही व कुठेही नैवेद्य खाल्ल्याचे पाहिले वा ऐकले नाही,' असे म्हणतात. दुसऱ्या दिवशी नामदेव नैवेद्य घेऊन जातात, मुर्तिपुढे ठेवतात, देव प्रगट होतो व त्यांनी दिलेला नैवेद्य खातो. तेव्हा कुठे, त्यांच्या वडिलांना नामदेव घडले तेच म्हणजे खरे तेच सांगत होता, असे कळून येते. हेच नामदेव पुढे संतांच्या सभेत कच्चे मडके ठरतात. देव सांगतो त्याप्रमाणे ते गुरूंकडे जातात, गुरूंकडून प्रबोधित होतात व मूर्तितून येणारा देहधारी देव हे देवाचे पूर्ण रूप नसून देव चराचरात सर्वत्र भरून उरला आहे, असे अनुभवू लागतात.

संत श्रीनामदेव यांच्या या उदाहरणावरून घ्यावयाचा बोधच जणू श्रीहंसराजस्वामी यांनी आपल्या 'वेदान्तकाव्यलहरी' या ग्रंथात विशद करून ठेवला आहे.१ आधी त्यांचे काव्य वाचूया आणि मग त्याआधारे दगडाधातूच्या मूर्तितला देव प्रसन्न करून घेणे हे महाकठीण असते व त्यापेक्षा स्वदेहातल्या देवाला प्रसन्न करणे सोपे असते, हा त्यांनी सयुक्तिक पटवून दिलेला संत-विचार समजून घेऊयात.

श्रीहंसराजस्वामी म्हणतात,

''देव चराचर व्यापुनि भरला, अचरांत तो परी निजला।।  
चरसृष्टींत दिसे तो जागा, मनुजांत स्पष्ट अवतरला।।१।।  
निजत्यास जागवोनी, त्यासी मग बोलणें कठिण फार।।  
जो आयताच जागा हृदयीं, त्यासीच सुलभ व्यवहार।।२।।  
याकारण देवाचें देउळ नरदेह, त्यांत प्रभु जागा।।  
भक्तास पावतो हा सत्वर, येथेंच त्यांस तूं भज गा।।३।।  
सोपें, सन्निध टाकुनि, लांब कठिण साधनांत कां मरती।।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

न कळे वेडें जग हें, दगडाधोंड्यास कां उगी भजती।।४।।
दगडांत देव आहे, भावबळें तो प्रसन्न होइ जरी।।
दुष्काळ भावनेचा, परकी राज्यांत जाणवे भारी।।५।।
हा काळ भावनेचा नाहीं, ज्ञानास फार अनुकूल।।
ज्ञानी पुरुषास शरण जावें, अज्ञान हेंच भवमूल।।६।।
बहु घर्षण केल्यानें, जड काष्ठीं प्रगटतो जसा अग्नी।।
बहु आंच भावनेची लागे तरि, प्रगट देव पाषाणीं।।७।।
वितळे न जसें सोनें, तीव्रपणें उष्णता दिल्यावीण।।
वितळेना दगड तसा देवपणें, तीव्र भावनेवीण।।८।।
ही तीव्रता दिसेना कोठेंही, मंदभाव तो व्यर्थ।।
शीणचि पदरांत पडे, यायोगें स्वार्थ नाहि परमार्थ।।९।।
फलप्राप्ति कठिणमहा मूर्तिमाजील देवताभाव।।
यास्तव चेतनरूपीं ब्रह्मगुरू सुलभ भक्तिचा ठाव।।१०।।
भूमींत सर्व ठायीं जल भरलें, खोदतां अती कष्ट।।
जल आयतेंच भरलें कूप, तृषार्ता असे खचित इष्ट।।११।।
त्यापरि पाषाणादिक जड मूर्ती देवभाव त्यापरिस।।
हृदयस्थ कळो, न कळो देव, असा भाव सुलभ सर्वांस।।१२।।
हृदयस्थ देव सोडूनि, शिरती कां लोक आडरानांत।।
न कळे रे हृदयस्था तव भजना सुमति दे तया तात।।१३।।
इतुक्या उपरी ज्यांच्या दगड पुजावा असेंच ये चित्ता।।
पूर्वार्जित तितुकेची त्यांचें, तूं मात्र सेवि हृदयस्था।।१४।।''

या काव्यातून श्रीहंसराजस्वामींनी वेदान्त म्हणजे वेदांचे सार स्पष्ट केले आहे. ते असे-

चर व अचर म्हणजे जंगम व स्थावर (सजीव व निर्जीव) असलेल्या या विश्वात देव सर्वत्र व्यापून भरलेला आहे. (म्हणूनच, 'विश्वंभर' या नामाने देवाचे स्वरूप व्यक्त केले गेले आहे. उदाहरणार्थ, **'विश्वीं विश्वंभर। बोले वेदान्ताचे सार।।१।।**, असे संत श्रीतुकाराम यांनी म्हटले आहे.) देव जरी चराचरात भरलेला असला तरी तो अचरात म्हणजे स्थावरांत निजलेला आहे; याउलट चरसृष्टीत म्हणजे सर्व सजीवांच्यात तो जागा आहे आणि मनुजांत म्हणजे सर्व मानवांमध्ये तो स्पष्टपणे अवतरलेला आहे.

सदर काव्याच्या पहिल्याच कडव्यात 'अवतरला' हा शब्द आहे. हा अगदी समर्पक शब्द उपयोजून श्रीहंसराजस्वामींनी अध्यात्माचे वर्म व मानवदेहाचे महत्त्व सूचित केले आहे. त्यातून, मानवदेहांत परमेश्वर अवतरलेला असतो, हा आत्मकल्याणकारी सिद्धान्तच त्यांनी व्यक्त केला आहे. 'मनुष्यअवतारांमाझारी' आपण अठरापगड जातीत जन्मलो होतो, असे शुकदेवांनी म्हटले असल्याचे श्रीनामदेवांनीही शुकाख्यानात म्हटले आहे. अर्थात, विश्वातील सर्व जातीधर्माच्या मानवांच्यात परमेश्वर जागा असतो, असे तेही सांगून गेले आहेत.

देवाने इतर अनेक प्राण्यांचे देह निर्माण केले आहेत. पण ते प्राणी भक्ती करून देवाशी एकरूप होऊ शकत नाहीत. देवाशी एकरूपता साधण्याची पात्रता त्यांच्यात नसते. ते सहजप्रवृत्तीने, सृष्टीक्रमानुसार, निसर्गनियमानुसार जगत असतात. मानवाच्या तुलनेत पशु, पक्षी वगैरे जीव 'अल्पमती' असतात. याउलट, मानव बुद्धियुक्त असतात. त्यांच्या ठिकाणी संकल्प-स्वातंत्र्य असते. आहार, निद्रा, भय व मैथुन या चार बाबतीत मात्र माणसे व प्राणी समान असतात. स्वामी विवेकानंद म्हणतात त्याप्रमाणे अगदी निकृष्ट प्राण्यांपासून ते अगदी उत्कृष्ट प्राण्यांपर्यंत सर्वांच्याच ठिकाणी चित्त असले तरी फक्त मनुष्य शरीरातच ते

बुद्धिच्या रूपात विकसित झालेले असते. गायीला किंवा कुत्र्याला मन असले तरी त्यांच्या चित्ताने, आपण ज्याला बुद्धी म्हणतो ते रूप अजून धारण केलेले नसते.२ पण, परमेश्वराने स्वत:चा विशेष अंश मानवी प्रकृतिच्या ठिकाणी प्रविष्ट करून विश्वातील सर्व मानवांना ती विशेष बुद्धी म्हणजे आत्मज्ञानप्राप्तीचा अधिकार देऊन ठेवलेला आहे. या विशेष बुद्धीमुळेच म्हणजे ज्ञानशक्तिमुळेच मानवी प्रकृतिला पौरुषत्व वा पुरुष हे सर्वोत्तम ध्येयलक्ष्यीं नाव प्राप्त झालेले आहे.३ अर्थात, आत्मारूपी देवाची प्राप्ती करून घेणे हे मनुष्य-देह-निर्मितीमागील देवाच्या मनात असलेले प्रयोजन होय.

अशा प्रकारे, आयताच म्हणजे स्वयंसिद्ध असलेला देव मनुष्य-शरीरांत जागा असतो म्हणूनच देह हे देवाचे देऊळ आहे, असे संत म्हणतात. उदाहरणार्थ, मानवदेह ही देवाची चालतीबोलती देवळे आहेत, असे समर्थ श्रीरामदासस्वामी म्हणतात.४ देव आपल्या देहातच असल्याने त्याच्याशी बोलण्याचालण्याचे व्यवहार करणे सुलभ म्हणजे सहज शक्य वा सोपे असते; म्हणूनच (श्रीनामदेवांसारखा अंत:करणात सद्‌भाव असलेल्या) भक्तास देहस्थ देव सत्वर म्हणजे लगेच पावतो, हे लक्षात घे व देहात असलेल्या देवालाच तू भज, असे श्रीहंसराजस्वामी यांनी उपदेशिले आहे. अशाप्रकारे, आपल्या सन्निध म्हणजे जवळच असलेल्या देवाला जागे करणे सोपे असते, हे समजून-उमजून न घेतां जे करावयास प्रदीर्घ काळ लागतो व जे करणे खरे तर अतिशय कठीण असते तेच मूर्तिपूजारूपी साधन लोक कां बरे करीत राहतात, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. (दगडाधोंड्याला उगीच भजत राहणारे हे लोक वेडे (म्हणजे अज्ञानी) आहेत, असा आपला अभिप्राय देखील त्यांनी व्यक्त केला आहे.)

अचरांत म्हणजे उदाहरणार्थ दगडापासून किंवा एखाद्या धातूपासून तयार केलेल्या मूर्तीत जो निजलेला म्हणजे झोपलेला असतो त्या देवाला आधी (श्रीनामदेवांनी केला तसा) जागा करून (प्रगट व्हावयास भाग पाडून) त्याच्याशी बोलणे-चालणे हे फार कठीण असते. हे जर महाकठीण नसते तर, आपल्या देशात देवाला रोज नैवेद्य खावयास देणारे व देवाबरोबर बोलणारे-चालणारे नामदेवांसारखे लाखोकरोडो संत असल्याचे दिसून आले असते, संत श्रीज्ञानेश्वरांनी 'पसायदानात' अपेक्षिलेली 'ईश्वनिष्ठांची मांदियाळी' गावोगावी दिसून आली असती.

दगडात देव आहे व तो व्यक्तीच्या ठिकाणी असलेले भावबळ पाहूनच प्रसन्न होत असतो. म्हणूनच उदाहरणार्थ, 'भावबळें आकळे येऱ्हवी नाकळे', असे जे संत म्हणतात५ ते खरेच आहे. पण (श्रीनामदेवांच्या ठिकाणी होती) ती तीव्रोत्तम भावना मात्र लोकांच्या ठिकाणी दिसत नाही. तिचा या परकी म्हणजे अज्ञानी लोकांच्या राज्यात भारी (फार मोठा) दुष्काळ असल्याचे जाणवत आहे. वर्तमानकाळ केवळ भावनेचा नसून ज्ञानास अनुकूल असा आहे. म्हणजे, केवळ भावना असून चालणार नाही तर तिच्याबरोबर देवाधिदेव कधी व कसा प्रसन्न होतो त्याचे अचूक ज्ञान करून घेणेही आवश्यक आहे. त्यासाठी, देवाच्या व स्वत:च्या स्वरूपाचे ज्ञान झालेले आहे अशा (आत्म)ज्ञानी पुरुषाला (सद्‌गुरूंना) शरण जाणे आवश्यक असते.६ स्वत:च्या व देवाच्या स्वरूपाला विसरला, स्वरूपाचे ज्ञान राहिले नाही, म्हणूनच नाशिवंत देहरूपी संसारात (भवसागरात) आपल्याला अडकून पडावे लागले आहे, हे त्या ज्ञानी पुरुषाकडून नीट समजून घेणे आवश्यक असते.

लाकडे जड असतात. पण, तीच बराच वेळा एकमेकांवर घासली की त्यांच्याठिकाणी ज्याप्रमाणे अग्नी प्रगट होतो त्याप्रमाणे व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या भावबळाची आच लागली तर व तरच दगडामध्येही देव प्रगट होतो. तीव्र उष्णता दिल्याशिवाय सोने जसे वितळत नसते तसेच तीव्र भावनेशिवाय दगडही देवरूपाने वितळत नसतो. (श्रीनामदेवांच्या ठिकाणी होती ती) तीव्र भावना मात्र कुठेही आढळून येत नाही. त्या तीव्रतेशिवाय असलेला लोकांच्या ठिकाणचा मंदभाव व्यर्थ होय. कारण, त्या मंदभावामुळे दगड देवरूपाने प्रगट होत नसतो. तरीही जे लोक दगडाची पूजा करीत राहतात त्यांच्या पदरात फक्त शीणच पडतो. अर्थात, त्यामुळे जसा (व्यावहारिक) स्वार्थ साधला जात नसतो तसाच स्वहिताचा स्वार्थही म्हणजे देवरूपी परमार्थही

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

साध्य होत नसतो.

दगडाधातूपासून तयार केलेल्या जड मूर्तिमधील देवताभाव प्रगट होणे हे खरे तर महाकठीणच असते. म्हणूनच चेतन असलेल्या ब्रह्मनिष्ठ गुरूंच्या ठिकाणीच भक्तिभाव ठेवणे, तेच चेतन स्वरूप असलेले साक्षात देव आहेत असे समजून घेणे, हे सुलभ व सोपे असते. स्वत: देवानेही, माझी प्राप्ती होते म्हणजे नेमके काय ते समजून देण्याघेण्यासाठीच गुरूशिष्य-परंपरा सुरू झाली आहे, असे श्रीज्ञानदेवांच्या मुखातून सांगितले आहे.७

जमिनीत सर्व ठिकाणी पाणी भरलेले असते. ते खोदून काढणे अति कष्टाचे असते. पण नैसर्गिक विहिरीत पाणी आयतेच भरलेले असते. तेच जसे तीव्र तहान लागलेल्यास इष्ट असते त्याचप्रमाणे दगडाधातूच्या मूर्तितील देवभावापेक्षा आपल्या स्वत:च्या हृदयात देव आहे, हे सत्य कळत असो वा नसो, पण तोच देव सर्वांना सदासर्वदा सुलभ असतो. आपल्या हृदयातच सदैव उपलब्ध असलेल्या जागृत देवाला सोडून लोक त्याला शोधण्यासाठी आडरानात म्हणजे इतरत्र कां बरे शिरतात ते मात्र कळत नाही. म्हणून हे हृदयस्थ देवा! त्या लोकांना तुझे भजन करावयाची सद्‌बुद्धी तू दे, अशी विनंतीही श्रीहंसराजस्वामी यांनी देवाला केली आहे.

एवढे सांगूनही आपण दगडाधातूंच्या मूर्तीचीच पूजा करावी असे ज्यांच्या मनात येत असेल तर ते त्यांचे पूर्वार्जित म्हणजे त्यांच्या पूर्वकर्मांचे फळच होय, हे समजून घे; पण, तू मात्र तसे न करता तुझ्या हृदयात असलेल्या देवाचीच भक्ती कर, असा निर्णायक सदुपदेशही, त्यांनी आपल्या अनामिक शिष्याला म्हणजे पर्यायाने आपल्या सर्वांना, सदर 'वेदान्त काव्यलहरी'त शेवटी केला आहे. अर्थात, मूर्तिपूजेच्या बालवाडीतले शिक्षण पूर्ण करून पुढे जात जात संताप्रमाणे अध्यात्माची पीएच. डी.पदवी संपादन करणे श्रेयस्कर असल्याचे जणू त्यांनीही साभिप्राय नमूद करून ठेवले आहे.

* * * * *

**संदर्भसूची व टिपा :**

१. श्रीहंसराजस्वामीकृत 'वेदान्त काव्यलहरी' हा ग्रंथ 'ट्रान्सलिटरेचर फाऊंडेशन' या वेबसाइटवर उपलब्ध आहे. त्याबद्दलचा अभिप्राय दिनांक २६/०६/१९३८ रोजी 'दैनिक सकाळ'च्या अंकात छापून आलेला आहे.

२. पृष्ठ क्र. १११; राजयोग, रामकृष्ण मठ, नागपूर - १२, (१९८४)

३. श्रीएकनाथी भागवत, ७.२४५-२४६;

४. दासबोध,१७.१.१२-१४ : देव पहावयाकारणें। देउळे लागती पाहणे। कोठे तरी देउळाच्या गुणें। देव प्रकटे।। देउळे म्हणिजे नाना शरीरें। तेथें राहिजे जीवेश्वरें। नाना शरीरें नाना प्रकारें। अनंत भेद।। चालती बोलती देउळे। त्यांमध्ये राहिजे राउळें। जितुकी देउळे तितुकी सकळें। कळली पाहिजे।।;

५. श्रीज्ञानदेव हरिपाठ, अभंग क्र.१२;

६. श्रीज्ञानदेव हरिपाठ, अभंग क्र. ५ : भावेंविण देव नकळे नि:संदेह। गुरुविण अनुभव कैसा कळे।।;

७. ज्ञानेश्वरी, १८.१२२६ : भगवान श्रीकृष्ण अर्जुनास सांगतात, 'एक शिष्य एक गुरु। हा रूढला साच व्यवहारु। तो मत्प्राप्तिप्रकारु। जाणावया।।'

-डॉ. विजय बाणकर,
मु. पो. खडकवासला (आर.एस.), पुणे - ४११०२४,
(९३२५५८८०९५)

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## हरिपाठाच्या गाभाऱ्यात (भाग ४)

### जाणीव नेणीव भगवंती नाही!

सर्वांघटी म्हणजे सर्व देहांमध्ये आत्मारामास पाहणे ही शुद्ध भावना निर्माण होण्यासाठी जपतपादि-कर्मोपासना केली जाते. पण जप, तप, क्रिया, नेम, धर्म इत्यादिकांचे आचरण करणारे लोक अनेक आहेत. पण त्यांच्या त्या साधनेचे शुद्ध भावनेत पर्यावसान झालेले नसते. याचे कारण कर्त्याचे ठिकाणी कर्तव्यमद व फलासक्ती हे दोन दोष असतात. अश्रद्धेने केलेले हवन, दिलेले दान, तप, न केलेले कर्म जे असेल त्याला असत् म्हणतात. इहलोकी व परलोकीही त्याचे फळ नाही. नामाचा हा मार्ग सोडून, श्रद्धेला आधार नाहीसा करून दुराग्रहाचे बळ वाढवून मग कोट्यवधी अश्वमेध यज्ञ केले. रत्नांनी भरून पृथ्वी दान दिली. एकाच अंगठ्यावर उभे राहून हजारो वर्षे तपश्चर्या केली, तरी ते व्यर्थ होय.

**-नामदेव सदावर्ते**

**भ**गवंताच्या नामस्मरणात तल्लीन झालेला भक्त संसारातील सुखासाठी धावपळ करीत नाही. जे मन भगवत्स्वरुपात रंगले त्याची व्यवहारी हालचाल, धडपड बंद पडते. कारण हालचाल, व्यर्थ धडपड हे बहिर्मुख मनाचे लक्षण आहे. परमात्मस्वरूपी मग्न झालेले मन अंतर्मुख असते. त्यांच्या मनाची धाव स्थिरावते. ज्याप्रमाणे भ्रमर मकरंद सेवन करण्याच्या भरात त्या कमल कलिकेत सापडला जातो. त्याला फुलातून बाहेर येण्याचे भान राहत नाही. त्याप्रमाणे हरीच्या नामस्मरणात दंग झालेला साधक हरिस्वरुपात एकरूप होतो व तो फिरून प्रपंचाकडे वळत नाही. ज्ञानराज सांगतात-

**हरिपाठी गेले ते निवांतचि ठेले।**
**भ्रमर गुंतले सुमन कळिके।।**

सर्वांचे सार एक नारायण आहे. त्याचाच तू जप कर. याविषयी वेद, शास्त्र, श्रुती यांचे वचन प्रमाण आहे. इतर जपतपादि कर्मे करण्याचे श्रम हरिभजनावाचून व्यर्थ आहे. हरिस्वरूपी लीन झाल्यावर प्रपंचातील त्रिविध तापांची चिंता करण्याची गरज नाही. हरिनाम हाच माझा मंत्र व हेच माझे शस्त्र आहे. त्याच्या दराऱ्यामुळे यमाने आमच्या कुळगोत्राचा त्याग केला आहे, असे ज्ञानराज सांगतात. श्रीहरिच्या चिंतनात मग्न असलेल्या भक्ताचे मन भगवद्रूप होते व विषयांचे चिंतन करणाऱ्या अभक्ताचे मन विषयवासनासक्त होते. त्यापासून क्रोध निर्माण होतो. क्रोधापासून संमोह निर्माण होतो. संमोहापासून स्मृतिभ्रंश व त्यापासून बुद्धिनाश होतो. बुद्धिनाशाने पुरुषार्थाचा व जीवनाचा नाश होतो. म्हणून विषयचिंतनात मन रमविण्यापेक्षा श्रीहरिचिंतनात ते जर एकरूप झाले तर विषयाकडे त्याची धाव जाणार नाही. मनच ईश्वरस्वरूप होईल. ज्ञानराज म्हणतात-

**तू मन हे मीचि करी।**
**माझेया भजनी प्रेम धरी।**
**सर्वत्र नमस्कारी। मज एकाते।।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

हरिचे नाम घेण्यास शुद्ध काळ-वेळेची जरुरी नाही. ते हवे तेव्हा घ्यावयास हरकत नाही. त्यायोगाने मातापित्याचा अथवा नाम घेणारा व ऐकणारा या दोहोंचाही उद्धार होतो. रामकृष्णाचे नामस्मरण सर्व पापांचा नाश करणारे आहे. सर्व पापांचा नाश करून मूर्ख जीवांना तारणारा एक हरीच आहे. हरिनाम हेच सर्व ज्ञानाचे सार आहे. नामस्मरण, हरीभजन करण्याकडे ज्याने आपल्या जिव्हेची योजना केली आहे, त्याच्या दैवास कोणती उपमा द्यावी? ज्ञानराज सांगतात, माझ्याकडून हरीचे चिंतन यथासांग झाले, आता माझ्या पूर्वजांना वैकुंठास जाण्याचा मार्ग सोपा झाला आहे.

इतर अनेक पूजाविधींसाठी मुहूर्त पहावा लागतो. तीर्थक्षेत्री, मंदिरात, त्रिवेणी संगमावर स्थळकाळादिकांचे बंधन असते. पण श्रीहरीचे नामस्मरण करण्यासाठी कोणतेही बंधन नाही. नामस्मरणासाठी आपल्या अंतःकरणाची शांतता, भीतीरहित मन, ईश्वराच्या ठायी दृढ चित्त, संयमित मन असावे लागते. वेदशास्त्रात सांगितलेली नित्यनैमित्तिक व काम्यकर्मे, धर्माचरण हे शास्त्रात सांगितल्याप्रमाणेच यथासांग करावे लागते. काही दोष राहिल्यास कर्ता पतन पावतो. संध्येला काळ-वेळ-स्थान शूचिर्भूत हवे. अन्यथा संध्येचे कर्म व्यर्थ होते, निष्फळ होते. पण भगवंताचे भजन करण्यास कोणतेही बंधन नाही. आपली कर्तव्य-कर्मे, व्यवसाय करीत असतानाही नामस्मरण केले तरी चालते. ध्यानाला एकांत पाहिजे. कारण मन हे रजोगुणाचे कारण असल्याने नुसता वारा जरी आला, तरी मनाची चलबिचल होते. निराहार न राहता सुखाने अन्न खाऊन देवाचे नामचिंतन करावे.

जे कोणी झोपले असतानाही नामस्मरण करतील, तर श्रीहरी त्याच्याजवळ येऊन उभा राहतो. कोणी भाविक आसनावर बसून नामस्मरण करील, तर तो देव डोलू लागतो. तर, ध्यानाचा पडल्यापडल्या अभ्यास होणार नाही. त्याला योग्य आसन लावून बसावे लागते. परंतु, नामस्मरण कधीही, कुठेही करावे. तुकोबा स्पष्टपणे सांगतात -

**म्हणोनि गोड सर्व भावे। आंघोळी न लगे तोंड धुवावे।**
**आर्तचाड जीवे। न लगे भ्यावे संसारा।।**

नामस्मरण हे सर्वदृष्टीने चांगले आहे. त्यासाठी अंघोळ करण्याची वा तोंड धुण्याची गरज नाही. संसारी जीवांनी नामस्मरण करताना द्रव्यादिकाची योग्य इच्छा मनात धरली तरी चालेल. संसाराला भिण्याचे तर काहीच कारण नाही. नामस्मरणासाठी स्नानाची गरज नाही हे खरे, पण शरीर शुद्धिसाठी स्नान करणे आवश्यक आहे.

आपला खरा स्वार्थ साधण्याच्या अवस्थेत प्रेमभक्ती करीत, अत्यंत प्रीतीने व निष्ठेने भक्त आपली सारी चित्तवृत्ती श्रीहरीचरणी ठेवीत असतो. त्याच्या जिव्हेवर निरंतर नाम नाचत असते. जे स्वानंदाने हरिनामाचा गजर करीत असतात, ते संसारात अत्यंत धन्य होय. पूर्णप्रेमाने व सद्‌भावनेने नित्य नामस्मरण केले असता वृत्ती आपोआप पालटून जाते. नामस्मरणाने श्रीहरी हृदयात स्थिर होतो.

सतत श्रीहरीचे नाम घेण्याचा ज्यांचा नियम आहे, असे प्राणी दुर्मिळ आहेत. त्यांच्याजवळ लक्ष्मीपती विष्णू असतो. नेहमी नित्यनेमाने जे नारायणहरी, नारायणहरी हा जप करतात, त्यांच्या घरी सर्व ऐश्वर्य व सलोकतादि मुक्ति असतात. जन्मास येऊन जर हरीची ओळख झाली नाही, तर त्या जन्मास नरकच समजावे. तो प्राणी यमाच्या घरचा पाहुणा होतो. म्हणजे तो यमलोकी जातो. ज्ञानेश्वर महाराजांनी आपले गुरू जे निवृत्तीनाथ, यांना हरीचे नाम केवढे आहे, असा आपल्या इच्छेनुरूप प्रश्न केला असता त्यावर

सद्‌गुरू निवृत्तीनाथांकडून आकाशापेक्षा ही नाम मोठे आहे, असे उत्तर मिळाले.

**ज्ञानदेव पुसे निवृत्तिसी चाड।**

**गगनाहुनि वाड नाम आहे।।**

नित्यनेमाशिवाय मनुष्याचा जन्म फुकट आहे. तुकोबा म्हणतात -

**काही नित्यनेमाविण। अन्न खाय तो श्वान।**

**वाया मनुष्यपण। भार वाहे तो वृषभ।।**

जो मनुष्य भोजनापूर्वी श्रीहरीची पूजा, गीता, हरिपाठ पठण, हरिनाम जप करीत नाही, फक्त अन्न खातो, तो कुत्रा आहे. तो व्यर्थ मनुष्यपणाचा भार वाहतो. पण नित्यनेम जो पाळतो, त्याच्याजवळ लक्ष्मीपती भगवान वास करतात. गगनादिक आकाशापेक्षा पंचमहाभूतांपेक्षा भगवंत मोठा आहे. कारण त्याच्यापासून पंचमहाभूते उत्पन्न झाली आहेत.

हा संसार कोणी सात तत्त्वांचा, कोणी पाच तत्त्वांचा, कोणी तीन तत्त्वांचा, तर कोणी दहा तत्त्वांचा मानतात. ही सर्व तत्त्वे हरी आपल्या एका चैतन्य तत्त्वावर दाखवितो. असा तत्त्वविचार करणाऱ्यापैकी हरिनाम नाही. ते सर्व साधनांपेक्षा श्रेष्ठ आहे. श्रीहरीचे नाम घेण्यास काहीच कष्ट पडत नाहीत. रात्री व दिवसामिळून एकवीस हजार सहाशे वेळा सोऽहं-सोऽहं असा आपल्या हृदयात प्राणाच्या वरती जाण्यात आणि अपानाच्या खाली जाण्यात उभयतांच्या भेटीत सहज जप होत असतो. त्यास अजपाजप असे म्हणतात. त्या साधनातही मनाचा निश्चय पक्का असावा लागतो. संत ज्ञानराज म्हणतात- हरीच्या नामस्मरणावाचून जगणे मला व्यर्थ वाटते, म्हणून मी रामकृष्ण नामाच्या भजनमार्गाने चालतो आहे. मी निरंतर हरिनामस्मरण करीत असतो.

**सात पाच तीन दशकांचा मेळा।**

**एक तत्त्वी कळा दावी हरी।।**

नामस्मरण हे सर्व तत्त्वांपेक्षा श्रेष्ठ तत्त्व आहे. सातच तत्त्वे आहेत, असे प्रतिपादन करणारे फक्त आकाशादि पाच भूते, जीव व सर्वाधार आत्मा मिळून ही सात तत्त्वे मानतात. आणि त्यापासून शरीर, इंद्रिये व प्राण उत्पन्न झाले असे मानतात. कोणी संसार हा एक तत्त्वाचा, कोणी तीन, कोणी पाच, कोणी पंचवीस व कोणी छत्तीस तत्त्वांचा मानतात. परंतु, या सर्वांचे मूळ  एक हरी आहे.

हा तत्त्वविचार क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक आहे. वायू, आकाश, उदक, तेज व पृथ्वी या पंचमहाभूतांपासून स्थूल प्रकृती निर्माण होते. ज्ञानेंद्रिये पाच, कर्मेंद्रिये पाच व मन अशी अकरा इंद्रिये मिळून विकारांची संख्या सोळा आहे. त्यात प्रकृती व पुरुष हे दोन, तसेच मन, अहंकार व पंचविषय मिळून पंचवीस तत्त्वांचा तत्त्वविलास मानतात. सात, पाच, तीन व दशक असा हा पंचवीसांचा मेळा एका चैतन्यतत्त्वावर आधारित आहे.

हे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांनाच काय, पण जेथे शंकर, ब्रह्मदेव आदि देवादिकांनाही हा तत्त्वविचार गूढ, अगम्य आहे. ते गूढ समजून घेण्याचा खटाटोप करण्यापेक्षा नामस्मरण करावे. कारण त्यासाठी काहीही कष्ट पडत नाहीत. परमात्मा एकच सत्य आहे. बाकी सर्व खोटा, मायिक पसारा आहे. तत्त्वविचार दूर सारून हरिनामस्मरण करणे सोपे आहे. तेथे काही कष्ट लागत नाहीत. शारीरिक, वाचिक, बौद्धिक, मानसिक कष्ट नामासाठी लागत नाहीत. योगीजन अजपाजप करतात पण तेथे मन स्थिर करावे लागते. अखंड अनुसंधान करावे लागते. नामस्मरणात अनुसंधान आपोआप घडते.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

**तैसे नव्हे नाम सर्वत्र वरिष्ठ।**

**तेथे काही कष्ट न लागती।।**

संतांनी दुर्लभ आणि दुस्तर असे लहानलहान मार्ग मोडून एकच मोठा रस्ता निर्माण केला. या मोठ्या रस्त्यावरून चतुरंग सैन्यसुद्धा चालू शकेल. पूर्वी परमेश्वराकडे जाण्यासाठी छोटे छोटे मार्ग, पाऊलवाटा होत्या. त्यावर अनेक धर्मबंधनांचे काटे, दगडगोटे असल्यामुळे ते मार्ग सामान्यांना अनुकूल नव्हते. म्हणून संतांनी नामस्मरणभक्तीचा राजमार्ग निर्माण केला.

**मोडूनिया वाटा सूक्ष्म दुस्तर।**

**केला राज्यभार चाले ऐसा।।**

ज्ञानराज म्हणतात, हरिनामावाचून मला जीवन जगणे व्यर्थ वाटते. म्हणून मी रामकृष्ण नामस्मरणाच्या भक्तिमार्गाने चालत असतो.

**ज्ञानदेवा जिणे नामेवीण व्यर्थ।**

**रामकृष्णी पंथ क्रमियेला।।**

ज्ञानराज ज्ञानेश्वरीतही सांगतात- अर्जुना या मृत्युलोकाचे सारेच विपरित आहे. बघ, येथे जे जन्माला आले आहे, त्यांना खरे सुख मिळत नाही. निखाऱ्याच्या शेजेवर कुणाला सुखाची झोप लागेल काय? इथला चंद्र क्षयरोगी, इथे उदय होतो तो अस्तासाठी. दुःख इथे सुखाचा अंगरखा घालून वावरत असते. गर्भ आईच्या उदरात असतानाच त्याला मरण गाठते. ज्याचे आयुष्य कमी झाले आहे व बक, बुद्धिही कमी झाली आहे, अशांना वडील म्हणून नमस्कार करतात. आयुष्यातील एक वर्ष कमी झाल्यावर आनंदाने वाढदिवस साजरा करतात. इथे जन्मलेले लोक तृष्णा, काम-क्रोधादि विकार वाढवितात. अशा मृत्युलोकात जरी तू जन्माला आला आहेस, तरी सर्व दूर सारून माझ्या भक्तिची वाट धर. त्यामुळे माझे निर्दोष असे परमपद तुला मिळेल. तू मन माझ्यात लीन कर. सर्वत्र असलेल्या मला नमस्कार कर. त्यामुळे तू माझ्या स्वरूपात मिसळशील. तरी झडझडोनि वाहिला निघ।



**इये भक्तिचिये वाटे लाग।**

**जिया पावसी अव्यंग।**

**निजधाम माझे।। ज्ञा. ९/५१६**

हरिपाठातील काही अभंगांतून ज्ञानदेव इतर अनेक साधनांपेक्षा नामस्मरणरूप साधन कसे सोपे आहे, ते सांगतात. जपतपादि कर्मे व अनेक नियमधर्म ज्या भावनेने करतो, त्या भावनेपेक्षा देहामध्ये एक आत्माराम पाहणे ही भावना शुद्ध आहे. अशा शुद्ध भावनेचा त्याग करू नकोस. या भावनेत बिघाड करणाऱ्या सर्व संशयास फेकून दे आणि रामकृष्ण नामाचा सारखा टाहो फोडीत राहा. जातीच्या, पैशांच्या,

कूळशिलादि गोष्टींच्या भानगडीत पडू नकोस. शुद्ध भावनेने युक्त होऊन त्वरेने हरीस भज. माझ्या ध्यानात व मनात नेहमी रामकृष्णाची वस्ती आहे. त्यामुळे वैकुंठलोकात माझी वस्ती झाली आहे.

**जप तप कर्म क्रिया नेम धर्म।**

**सर्वांघटी राम भाव शुद्ध।।**

सर्वांघटी म्हणजे सर्व देहांमध्ये आत्मारामास पाहणे ही शुद्ध भावना निर्माण होण्यासाठी जपतपादि-कर्मोपासना केली जाते. पण जप, तप, क्रिया, नेम, धर्म इत्यादिकांचे आचरण करणारे लोक अनेक आहेत. पण त्यांच्या त्या साधनेचे शुद्ध भावनेत पर्यावसान झालेले नसते. याचे कारण कर्त्याचे ठिकाणी कर्तव्यमद व फलासक्ती हे दोन दोष असतात. अश्रद्धेने केलेले हवन, दिलेले दान, तप, न केलेले कर्म जे असेल त्याला असत् म्हणतात. इहलोकी व परलोकीही त्याचे फळ नाही.

नामाचा हा मार्ग सोडून, श्रद्धेला आधार नाहीसा करून दुराग्रहाचे बळ वाढवून मग कोट्यवधी अश्वमेध यज्ञ केले. रत्नांनी भरून पृथ्वी दान दिली. एकाच अंगठ्यावर उभे राहून हजारो वर्षे तपश्चर्या केली, तरी ते व्यर्थ होय. ज्यामध्ये श्रद्धा नाही, ते उपासनाकर्म व्यर्थ खटाटोप, तसेच परमार्थातील ढोंग आहे. म्हणून ब्रह्मनामावरील श्रद्धा सोडून इतर उपासना करू नका, असे ज्ञानराज सांगतात.

सर्व प्राणीमात्रांत भगवत्भावाचे दर्शन घेणे हे अखंड साधन जे आचरतात, त्या पुरुषांचा देहाभिमान नष्ट होतो. स्पर्धा, असूया, तिरस्कार ह्या भावना नष्ट होतात. सर्व जगत् विष्णुमय जाणणे हाच वैष्णवांचा खरा धर्म आहे. भेदाभेद हा केवळ अमंगल भ्रम आहे. कोणत्याही जीवाचा मत्सर करू नये हेच सर्वेश्वरपूजनाचे वर्म आहे. ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय हे सर्व एकाच देहाचे अवयव आहेत. त्यांनी सेवन केलेले विषयांचे सुख, दुःख भोगणारा अंतर्यामी एक जीवच आहे. संत ज्ञानराज म्हणतात-

**न सोडी रे भावो टाकी रे संदेहो।**

**रामकृष्णी टाहो नित्य फोडी।।**

संशय टाकून शुद्ध भावाने रामकृष्ण नावाचा टाहो सतत फोड, म्हणजे अखंड नामस्मरण कर. टाहो कशाकरीता फोडायचा, तर परमात्म्याच्या ठायी वृत्ती स्थिर राहण्यासाठी. भगवन्नामाकरिता जात, गोत, कूळ , शील, धन, संपत्ती या कुठल्याही गोष्टींची गरज नाही. एकाच ठिकाणी बसून व एकचित्त मन करून मोठ्या प्रीतीने भगवंतास आळवावे. परमात्मा आपल्याजवळच आहे. तो आपणास तारणार आहे, अशी पूर्ण श्रद्धा ठेऊन नामस्मरण केले पाहिजे. सत्-चित्-आनंदरूप आत्मा ध्यानी-मनी असावा, असे संत सांगतात. भगवन्नाम सोपे आहे, ते उच्चारण करणारा मोठा पंडितच पाहिजे किंवा मूर्खच असला पाहिजे, असा नियम नाही. ज्ञानाकरीता मात्र बुद्धी तीक्ष्ण पाहिजे. भक्त ज्ञानी आहे की अज्ञानी आहे हे भगवंत पाहत नाही. नामस्मरणामुळे दोघांनाही सारखीच मुक्ती मिळते. नारायण हरी या नामाच्या उच्चारामुळे कळीकाळाचा तेथे प्रवेश होत नाही. हरीच्या यथार्थ स्वरूपाचा विचार वेदांनाही कळत नाही, मग ते स्वरूप सामान्य जीवांना कसे कळेल? ज्ञानराज म्हणतात, हरिच्या नामस्मरणाने सर्व ठिकाणी वैकुंठ आहे असा अनुभव दिला आहे. नामस्मरणाने ज्ञानी व अज्ञानी दोन्हीही भक्तांना माक्षमुक्ती प्राप्त होते.

देव हा भक्ताच्या अंतःकरणात असलेले प्रेम पाहतो. त्याचे ज्ञान-अज्ञान पाहत नाही. जोपर्यंत चित्तामध्ये आत्मबोध दृढ झाला नाही, तोपर्यंत ब्रह्मज्ञानाचे कितीही प्रतिपादन केले, तरी सिद्ध होत नाही. ज्ञानमार्गात फार अडचणी आहेत. भक्तिमार्ग सोपा आहे. तुकोबा म्हणतात- देवा, तू जर मनात आणले तर

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

हे जेवढे अडाणी, अज्ञानी, मूढजण आहेत, ते मोठे चतूर करशील. वेड्यांना पंडित करणे तुला काय अवघड आहे? नावाडी नावेत येणाऱ्यास, याला पोहता येते का, किंवा येत नाही, याचा विचार करीत नाही. कारण सर्वांना तारून नेणे हे नावाड्याचे काम असते. त्याप्रमाणे भगवंतावर भक्तीप्रेम ठेवून नामस्मरण करणाऱ्यास सर्वांना सारखीच मुक्ती मिळते.

भगवंत म्हणतात माझी हजारो नावे याच नावा असून, त्या तयार करून संसारसागरातून भक्तांना तारणारा मी नावाडी आहे.

**नामाचिया सहस्त्रवरी। नानां इया अवधारी।**
**सजुनिया संसारी। तारूं मी जाहलो। ज्ञा. १२/९०**

या करिता परमात्म्यावरून आपले शरीर ओवाळून टाकावे आणि आपल्या अंगी असलेल्या सर्व गुणांचे लिंबलोण करावे. तसेच संपत्तीचा मद ओवाळून टाकावा. मग अमर्याद भक्तिचा उत्कर्ष करून नामस्मरण करावे. हा श्रीहरीच्या स्वरुपास जाणण्याकरिता पुढे सरसावला, परंतु त्यालाही स्तब्ध बसावे लागले.

**वेद जाणों गेला पुढे मौनावला।**
**ते गुह्य तुजला प्राप्त कैचे।।**

मिठाची हत्तीण तयार करून खाऱ्या समुद्रात ठेवली असता ती जशी पुन्हा बाहेर काढता येत नाही. ती समुद्ररूप होऊन जाते, त्याप्रमाणे देवाला जाणायला गेलेला जीव परत येत नाही. ऋषी-मुनी भगवंतांना जाणतात व ते तद्रूप होतात. भक्ताला वैकुंठी जाण्याची गरज नसते. ते जिथे नामस्मरण करतात, तेथेच वैकुंठ असते. श्रीव्यासांना देवांनी ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला. पण, प्रल्हाद हा राक्षस कुळातील असूनही नामस्मरणाने उद्धरला. ध्रुव, प्रल्हाद अज्ञानी बालक होते. भगवंतांनी त्यांची उपेक्षा केली नाही. वाल्ह्या कोळी हा वाटमाऱ्या होता, पापी होता. त्याला भजन, पूजन, देवधर्म काहीच माहीत नव्हते त्याला नारदासारखा सद्गुरूरु भेटताच त्याला रामनामाचा उपदेश केला व महाकवी वाल्मिकी म्हणून त्यास देवही वंदन करू लागले.

**जाणीव नेणीव भगवंती नाही।**
**हरि उच्चारणी पाही मोक्ष सदा।।**
**श्रीहरि परमात्मा व ज्ञानराजांना वंदन ।।**

**-नामदेव सदावर्ते,**
'पसायदान' बंगला, मानकर मळा,
मखमलाबाद, नाशिक

***

## आंतु बाहेरी सर्वांपासी।



आत्मा सर्वव्याप्त आहे हे गीता सांगते म्हणजे प्रत्यक्ष भगवान श्रीहरी सांगतात. ज्या आत्म्याला कशानेच झळ लागत नाही, त्यावेळी तो अखंड आहे, तो अवकाशरूपी आहे. जसे समुद्रात समुद्रातील पाण्याशिवाय सूर्यासह काही दिसणार नाही, अशा मध्यभागी उभे केल्यावर दिशा अगर आपले निवास ओळखण्यास सांगितले असता जी अवस्था होते तशी अवस्था या जीवाची झालेली आहे. वरील अवस्थेत जसा समुद्र बाहेर आहे, तसा त्यातून बाहेर पडण्यासाठी तो देहातसुद्धा दडलेला आहे. जोपर्यंत मनुष्य त्या समुद्रातील पाण्याशी तादात्म्य पावत नाही वा तद्रूप होत नाही, तोपर्यंत त्याला पोहता येत नाही.

**- बंडोपंत कुलकर्णी**

**आंतु बाहेरी सर्वांपासी।**
**परि हा कोणासी नाढळे।**
**मोहियेली मायाभ्रमे।**
**संसार संभ्रमे म्हणोनिया।।**
**विस्मरणेंचि हा न पडे दिंठी।**
**स्वार्थ पोटीं विषयाचा।।**
**निळा म्हणे गेली वाया।**
**ऐसा पावोनियां नरदेह।।**

हा अभंग सर्वांगव्याप्त आहे. पहिल्या चरणात देह देवाचे मंदिर हे सांगितले आहे. दुसऱ्या चरणात आपण संसाराला सर्वस्व मानतो, मोह होतो व अशा कोणत्याही गोष्टीला संसाराला जोडून आपलंसं करतो, त्यातून सुटण्याचा मार्ग आहे,

**हीच थोरभक्ती आवडते देवा,**
**संकल्पावी माया संसाराची।।**

तिसऱ्या चरणात :

**रे मन मूरख, जनम गँवायौ।**
**करि अभिमान विषयरस गीध्यौ।**
**स्याम सरन नहिं आयौ।।**

या सूरदासांच्या रचनेनुरूप सांगितले आहे. खरे तर मुळात हा देह पवित्र आहे.

**पवित्र तो देह वाणी पुण्यवंत।**
**जो वदे अच्युत सर्वकाळ।।**

मोह, माया, स्वार्थ वाहणाऱ्या देहाला व मनाला स्वतःचे महत्त्व कळत नाही व ज्ञानाच्या अभावात त्याचा जन्म असून नसल्यासारखा असतो व वाया जातो.

जगद्‌गुरू तुकाराम महाराज म्हणतात,

**नारायण भूती न कळे जयांसि।**
**तयां गर्भवासी येणे जाणे।।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

**देव ऐसा जया कळला सकळ।**
**गेली तळमळ द्वेषबुद्धी।।**
**बुद्धीचा पालट नव्हे कोणे काळी।**
**हरि जळी स्थळी तया चित्ती।।**

या अभंगातून तेच सांगितले आहे.

आत्मा सर्वव्याप्त आहे हे गीता सांगते म्हणजे प्रत्यक्ष भगवान श्रीहरी सांगतात. ज्या आत्म्याला कशानेच झळ लागत नाही, त्यावेळी तो अखंड आहे, तो अवकाशरूपी आहे. जसे समुद्रात समुद्रातील पाण्याशिवाय सूर्यासह काही दिसणार नाही, अशा मध्यभागी उभे केल्यावर दिशा अगर आपले निवास ओळखण्यास सांगितले असता जी अवस्था होते तशी अवस्था या जीवाची झालेली आहे. वरील अवस्थेत जसा समुद्र बाहेर आहे, तसा त्यातून बाहेर पडण्यासाठी तो देहातसुद्धा दडलेला आहे. जोपर्यंत मनुष्य त्या समुद्रातील पाण्याशी तादात्म्य पावत नाही वा तद्रूप होत नाही, तोपर्यंत त्याला पोहता येत नाही. तादात्म्य व तद्रूप होऊन पोहता येत असतानाही तो स्वतःची ओळख पाणी म्हणून करून देऊ शकत नाही. कारण तो पोहताना पाण्यासम होता, याचे ज्ञान त्याला झालेले नसते. तसा जीव ब्रह्मरूप असूनही देहाने बद्ध होऊन स्वतः ब्रह्मरूप आहे, याचे ज्ञान त्याला होत नाही. हे ज्ञान त्याला नसल्याने तो देहालाच आपले अस्तित्व समजतो. म्हणून निळोबाराय म्हणतात ः

**आंतु बाहेरी सर्वांपासी।**
**परि हा कोणासी नाढळे।।**

मायेचा प्रभाव मोठा असतो. जे मूलतः अस्तित्वात नाही पण स्वतःचे अस्तित्व असल्याचे दाखविणे, ही माया होय. ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरीत चकाकणाऱ्या शिंपल्याला रजत समजले जाते, हा दृष्टान्त सांगून मायेची व्याप्ती, अज्ञान व ज्ञानाने अज्ञान नष्ट कसे होते, हे समजावून सांगितले आहे. जोपर्यंत मायेचे अस्तित्व व त्याची व्याप्ती लक्षात येत नाही, तोपर्यंत हा जीव देह, देहाधीन होऊन- देहासक्त सुख व्यापार।

हेची गा सार संसार।। असे म्हणत व मायेला कवटाळून बसतो. त्यात उत्कट होऊन बुडून जातो. जीवन म्हणजे जगणे, जगणे म्हणजे देहसुख, देहसुख म्हणजेच सार्थ व परमार्थ जीवन असा समज मायेमुळे घडतो व तशीच वाटचाल करून जीव संसारात टिकून राहतो. म्हणून निळोबाराय म्हणतात-

**मोहियेली मायाभ्रमे। संसार संभ्रमे म्हणोनिया।।**

मायेमुळे जीव आपली ब्रह्मरूप ओळख विसरतो. जीवन म्हणजे जगणे, जगणे म्हणजे देहसुख, देहसुख म्हणजेच सार्थ व परमार्थ जीवन या समजामुळे विषयाला परमार्थात स्थान देऊन वागत असतो. देवाला नवस बोलणे, पूजा, अर्चना, यज्ञ, हवन वगैरे तत्सम कर्म हे त्यातलेच प्रकार आहेत. याचा अर्थ ही सर्व कर्मे निरर्थक आहेत, असे नाही. जेवायला बसल्यावर ताटात मीठ वाढण्याचा प्रघात आहे. (आता हा प्रकार ९० टक्के कुटुंबात बंद आहे. स्वयंपाक करताना स्वयंपाक्याशिवाय अन्य जेवणाऱ्यांना काय लागते याचा अनुमान करून भाजी वगैरेत मिठाचा वापर केला जातो. मिठाची चव सर्वांना सारख्या प्रमाणात लागते, यात तथ्य नाही. देहाचे लाड पुरविताना प्रमाण बदलेले असते. शिवाय शारीरिक व्याधींमुळे कोणाला कमी लागते. मधुमेही रूग्णांच्या बाबतीत काही वेळा साखर नाईलाजाने खावी लागते. ज्यांना जितके हवे, तितके मीठ घ्यावे व वरून स्वतःला आवश्यक प्रमाणात मीठ घेतल्यास अन्नाची मूळ चव बदलत नाही. शिवाय आवश्यक तेवढे घेतल्यास अन्न तृप्ती देते.) असो. विषयाकडे येऊ.

ताटात मीठ वाढल्यावर अथवा फक्त मीठ खाल्ल्यास उदरभरण होत नाही. फक्त भाजीने पोट भरत नाही. उदरभरणाने संतृप्ती हवी असेल, तर संपूर्ण जेवण व अन्न हे सत्वयुक्त, सर्वांगसुंदर हवे. ज्येष्ठ वा वरिष्ठ यांचे आपल्या घरी आदरतिथ्य करणे चुकीचे नाही. पण या चांगल्या प्रथेला वाईट वळण लागले. ज्येष्ठ व

वरिष्ठ यांना प्रसन्न करून व आपल्या चुकांकडे दुर्लक्ष करण्यास भाग पाडून हवे ते मिळविण्याची प्रथा त्यामुळेच प्रचलित झाली. भ्रष्टाचार येथूनच सुरू झाला. असो. जप, जाप्य, देवाला नवस बोलणे, पूजा, अर्चना, यज्ञ, हवन वगैरे तत्सम कर्मे ही ताटातल्या मीठ व भाजीचे कार्य करतात. हे परमार्थात आवड निर्माण करतात व त्यात साध्य केलेली एकाग्रता ही ब्रह्मओळख करून देण्यास माध्यम ठरतात. जसे जेवताना निरनिराळ्या भाज्या व पक्वान्ने जेवणानंतर उदरात एकत्र येतात व स्वतःची स्वतंत्र ओळख संपुष्टात आणतात. तसे जप, जाप्य, देवाला नवस बोलणे, पूजा, अर्चना, यज्ञ, हवन वगैरे तत्सम कर्मे ही ब्रह्मओळखीच्या स्थानी स्वतःचे अस्तित्व संपवून टाकतात. त्यावेळी फक्त आणि फक्त ब्रह्म उरते. म्हणून कनिष्ठ काही नाही.

संत हे दीनांची माऊली असतात. परमार्थात कनिष्ठ वा अज्ञान त्याला संत दीन म्हणतात. संपत्ती वा धन याचा संबंध नाही. घर बांधण्याची इच्छा झाल्याशिवाय पाया खोदता येत नाही व पाया भरल्याशिवाय बांधकाम होत नाही. पहिलीच्या विद्यार्थ्यांना दहावीचा पेपर सोडव म्हणून सांगता येत नाही. तसे आध्यात्म शिकवण व ते प्राप्त करण्यासाठी दीनांच्या हृदयात परमार्थाचा पाझर निर्माण व्हावा म्हणून संतांनी अभंगरचना जप, जाप्य, पुजा, अर्चना, यज्ञ, हवन वगैरे तत्सम कर्मे ही अष्टांगयोग रूपात सांगितली आहेत. एकदा जेवायला बसल्यावर जेवणारा पोट भरल्याशिवाय जेवण बंद करणार नाही किंवा यजमानाकडील अन्न संपणे आवश्यक आहे. येथे माया यजमान आहे. पोट भरल्यावर जेवण संपणे, हा मायेवर विजय तर यजमानाकडील अन्न संपणे म्हणजे मायेतील ब्रह्म लुप्त होऊन अवकृपा होणे. त्यामुळे संतमन ओळखून आपण निम्नस्तरावरून विचार करणे आवश्यक आहे. संसारामुळे हे अशक्य ठरते. म्हणून निळोबाराय म्हणतात :

**विस्मरणेंचि हा न पडे दिंठी।**

**स्वार्थ पोटीं विषयाचा।।**

देह जर परमार्थकारणी लागला नाही, तर त्याला अध्यात्मज्ञान दुर्लभ नव्हे तर अशक्य आहे. मूळ स्वरूप ओळखीत आनंद आहे. जगात या देहाला तीन गोष्टींची भीती आहे. या देहाला मरणाची व जगण्याची भीती, जीवाला अन्न व जल अपुरे पडण्याची भीती व मनाला स्थिर व अस्थिरतेची भीती असते. जेव्हा हा देह नाममात्र असून, त्यातील जीवात्मा अकाल, त्रिकाल व सर्वकालीन आहे, याचे ज्ञान झाल्यावर हा देह असो अथवा नसो, काहीही परिणाम होणार नाही, याचे ज्ञान होताच सर्व भीती नष्ट होते. त्यामुळे ज्ञान आवश्यक आहे. जर हे ज्ञान करून घेतले नसेल, तर हा देह निरर्थक ठरतो. म्हणून निळोबाराय म्हणतात-

**निळा म्हणे गेली वाया। ऐसा पावोनियां नरदेह।।**

**आत्मा मालिक। कृष्णार्पणमस्तु।**

- बंडोपंत कुलकर्णी,
सोलापूर
जिल्हा न्यायाधीश, पुणे

***



## हे का भक्तीचे उपकार ?

**बंधू संतश्रेष्ठ तुकोबांच्या विरहाची सलणारी जाणीव संत कान्होबा महाराज ज्या शब्दांत व्यक्त करतात, ते आतून आलेले कढ खरेतर शब्दांपलीकडील आणि शब्दांत न मावणारेही असले तरी तुकयाबंधुंची ही करुणामय वाणी अजरामर-अमर- विशुद्ध आत्मिक आस्थेतून साकारली आहे. तुकोबांचा पांडुरंगाचा शोध आत्मशांतीत होता, मन:शांतीत होता. लौकिकापासून तर अलौकिकापर्यंतचा हा प्रवास आयुष्यातील बराच काळ देहूजवळील भंडारा डोंगरापर्यंत पोचत होता आणि तिथेच विसावतही होता..**

**-डॉ. सुनील शिंदे**

**ज**गद्‌गुरू संत तुकोबा बीज, वैकुंठगमनाच्या भावना-कल्पनेचा आदर करूनही एकदा खुद्द संत तुकोबारायांचे बंधू कान्होबा यांच्या कमालीच्या आक्रंदनपर प्रश्नांची-अभंगाची सत्यता पडताळूनच समजून घ्या मूळ घटनेचा सत्यांश मायबापहो!

**नको आपुलियां नेऊं वैकुंठासी।**
**दे माझ्या भावासी आणून वेगी।।**

असे कळवळून सांगणारे कान्होबा महाराज (ते स्वतःचा उल्लेख 'तुकयाबंधु' असा करीत) अत्यंत शोकाकुल भावावस्थेत, करुण स्वरांत साक्षात पंढरीनाथाच्या न्यायालयी दाद मागतात, हे विलक्षण आहे.

आईबापामागे आपल्या परिवारास सावरणारे भाऊ तुकोबा ज्यांचे उपकार-आभार अवर्णनीय, ही कान्होबा महाराजांची उदात्त भावना. तुकोबांची भक्ती, भावशक्ती, नामसाधना इतक्या पराकोटीची सोज्वळ सालस की या भावभक्तीला तोड नाही. याच भक्तीचे उपकार म्हणून चांगले नांदते असलेले घर उद्ध्वस्त केले, विध्वंसिले ही तळतळ व्यक्त करतात 'तुकयाबंधु' कान्होबा.

वैकुंठाहून आलेल्या विमानी बसोन जाताना आपले जगद्‌गुरू संत तुकोबाराय त्यावेळी उपस्थित असणाऱ्या जेवढ्या लोकांनी पाहिले, त्यात त्यांची पत्नी आवली अथवा बंधू कान्होबा किंवा घरातील एकाही सदस्याला दिसू नाही शकले ही केवढी दुर्दैवाची बाब! उपस्थितांतील सज्जन-भाविकांसह अन्य दुर्जन-लबाड-छळवाद्यांनाच बरे दिसले? असो.. एकवेळ हे ही मान्य की विमानी महाराज वैकुंठासी गेले, तर मग कान्होबांना एवढे सडेतोड आणि संताप व्यक्त करून बोलण्याची जरुरी का पडली? हे कां भक्तीचे उपकार। नांदते विध्वंसिले घर। असे का सुनवावेसे वाटले?

याशिवाय खुद्द संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगात जगातून निरोप घेण्याआधी 'माझा घातपात अथवा हित फार।' अशी खात्रीपूर्वक शक्यता का व्यक्त केली होती? ( सकलसंतगाथा : खंड ४, पृ. ६८६, संपा. डॉ. रा. चिं. ढेरे, वरदा प्रकाशन, पुणे )

चांगले नांदते, समाधानी घरकूल विध्वंसिले, असा स्पष्ट पवित्रा तुकयाबंधु संत कान्होबा पुढील अभंगात कसा घेतात पहा-

**मायबाप निमाल्यावरी।**
**घातले भावाचे आभारी।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

**हे कां भक्तीचे उपकार।**
**नांदते विध्वंसिले घर।।**

भावभक्तीची हीच का ती फलप्राप्ती अथवा परतफेड, असा प्रश्न पडतो कान्होबा महाराजांना. हा पंढरीनाथ 'कनवाळू, कृपाळू, उदार आणि दयावंत, मायाळू' जर आहे, तर इतके सारे अघटित घडताना काय म्हणून गप्प राहिला, अथवा पाहात राहिला? या एकाच जन्मी असे काय अन् कोणते पाप आम्ही केले, असाही तुकयाबंधुंचा आकांत आहे. 'गळेकाटू दिसतोसी' अशी संतापजनक भावना कान्होबा महाराज प्रकट करतात..

**'कनवाळ कृपाळ।**
**उदार दयाळ मायाळ।**
**म्हणवितोसी परि केवळ।**
**गळेकाटू दिसतोसी।**
**काय केलें होतें आम्ही।**
**सांग तुझे एक ये जन्मीं।।'**

'भक्तिभाव-मोक्ष मुक्ती, ब्रह्मज्ञान अवघे तुझे तुझ्याजवळ ठेव, जळूदेत हे तत्त्व. आधी माझ्या गुणी भावाला तातडीने आणून दे. रिद्धि-सिद्धी मोक्षदेखील तुझ्यापाशीच ठेव गुंडाळून.. माझ्या भावास त्वरेने दे आणून. नको तुझे वैकुंठ!' असा परखड पवित्रा घेतात कान्होबा महाराज.. यासंदर्भात काय म्हणतात तुकयाबंधु पाहा-

**भक्ति मुक्ती तुझे जळो ब्रह्मज्ञान।**
**दे माझ्या आणोन भावा वेगी।**
**रिद्धि सिद्धि मोक्ष ठेवी गुंडाळून।**
**दे माझ्या आणून भावा वेगी।**
**नको आपुलियां नेऊं वैकुंठासी।**
**दे माझ्या भावासी आणून वेगी।।**

हे आक्रंदन, हे अश्रू-उमाळा-कळवळा आणि काळजाला भेदणारी वेदना कान्होबा आपल्या अभंगात प्रभावीपणे, भावसामर्थ्याने, ताकदीने मांडतात.

बंधू संतश्रेष्ठ तुकोबांच्या विरहाची सलणारी जाणीव संत कान्होबा महाराज ज्या शब्दांत व्यक्त करतात, ते आतून आलेले कढ खरेतर शब्दांपलीकडील आणि शब्दांत न मावणारेही असले तरी तुकयाबंधुंची ही करुणामय वाणी अजरामर-अमर- विशुद्ध आत्मिक आस्थेतून साकारली आहे. तुकोबांचा पांडुरंगाचा शोध आत्मशांतीत होता, मन:शांतीत होता. लौकिकापासून तर अलौकिकापर्यंतचा हा प्रवास आयुष्यातील बराच काळ देहूजवळील भंडारा डोंगरापर्यंत पोचत होता आणि तिथेच विसावतही होता.. तुकोबा-कान्होबांचा सखा-सोयरा, आप्त सर्वस्व तर पांडुरंग होताच होता. या पांडुरंगाशी त्यांचे काही हाडवैर नव्हते. मात्र, पराकोटीची आस्था-आपुलकीतून वाद-संवाद तर नक्की होताच होता. हट्ट होता, स्नेह होता, विवाद होता. पांडुरंगाच्या चरणांचा 'आश्रय' ही होता!

तुकोबा कीर्तन-नामसाधना करतानाही त्यांच्याविषयी पराकोटीचा द्वेष करणारी-पोटदुखी असणारी पिलावळ केवढा छळ करीत, हे सर्वश्रुत आहे. खुद्द तुकोबांचा या संदर्भातील दाखला पाहा :

**धिक्कारिती मज करिता कीर्तन।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**काय सांगो शीण ते काळीचा।**

**तुका म्हणे मज वाटते उदास।**

**काय करु यास पांडुरंगा।।**

(सकलसंतगाथा : संपा. डॉ. रा. चिं. ढेरे, वरदा बुक्स, पुणे, अभंग क्र. ४१३६, पृष्ठ क्र. ६८९)

सालोमालो, मंबाजी-टंबाजीसारखी आणखी कितीतरी भुतावळ त्यावेळी छळवाद मांडण्यात सक्रीय होती हे आणखी खुलासेवार वेगळे सिद्ध करण्याची (विस्तार भयास्तव) आवश्यकता नाही!

तथापि, तुकोबांच्या अंतिम निरोपाने जशी इंद्रायणी गहिवरली, देहूची माती शहारली अन् भंडारा परिसर कळवळला, साक्षात पंढरीचा नाथ हळवा झाला, या गोष्टींची तमा देहूतील तत्कालीन काही हितशत्रूंना-करंट्या वैऱ्यांना थोडीच असेल? ते काही असो, मात्र, आपले तुकोबा त्यांच्या ठायी असणाऱ्या आत्मज्ञानाने-अजोड भक्तीने आणि चिरंतन अक्षर साहित्याने, अभंगाधारे 'जगद्‌गुरू' झाले, हीच मोठी घटना. म्हणूनच तर तुमचेआमचे, आपणा सर्वांचे तुकोबाराय 'आकाशाएवढे' घडले...

इंद्रायणी तीरावरला महाद्वारीचा हुंदका अन् आवलीचा आकांत, तसेच वैकुंठी विमानाचा बनाव यांवर माझ्या अस्वस्थ मनाने घेतले शब्दरुप.. मी केलेली रचना पुढीलप्रमाणे-

**तुकयाच्या मायमातीमधी**
**कंठ दाटे पारावर**
**महाद्वाराचा हुंदका**
**इंद्रायणी तीरावर**
**आभाळी कधीच विरले**
**आवलीचे आक्रंदन**
**असा कसा 'विपरीत डाव'**
**अन् विमानीचा बनाव**
**संथ पाण्याच्या प्रवाही**
**शब्दालागी ही भुरळ**
**गाथेचिया अर्थालागी**
**लागे धुळवडी नजर**

धुळवडीच्या दुसऱ्याच दिवशी घडलेली जगद्‌गुरु संत तुकारामांच्या अखेरच्या निरोपाची घटना हा न संपणारा शोध आहे.

- डॉ. सुनील शिंदे
'दत्त सुकृत', व्हेलेंसिया रेसेडेन्सी
अगस्ती साखर कारखाना रोड
अकोले : ४२२ ६०१, जि. अहमदनगर
(मो. ९४२३०४५३४२)

✻✻✻

# आत्मा मालिक गुरुपौर्णिमा महोत्सव २०२४

कोकमठाण येथील आत्मा मालिक ध्यानयोग मिशनद्वारे दि. १८ ते २१ जुलै २०२४ दरम्यान आत्मा मालिक गुरुपौर्णिमा महोत्सव भव्य स्वरुपात साजरा झाला. या उत्सवाला प्रत्यक्षात आषाढी महाएकादशीपासूनच प्रारंभ झाला. श्यामसुंदर आणि भजनीवृंदांनी श्री विठ्ठलाची भजने गायिली. गुरुकुलातील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रखुमाईची पालखी सजवून आणली.

गुरुपौर्णिमेच्या या भव्य सोहळ्यासाठी आश्रमातील सर्व संतमंडळी, विश्वस्त व इतर भक्तमंडळीने महिनाभर आधीपासूनच तयारी सुरू केली होती. त्यात मंदिराची सजावट, विद्युत रोषणाई, मांडव, सत्संग हॉलमधील आसन व्यवस्था, फुलांची आरास, इत्यादीचा समावेश होता. गुरुपौर्णिमेसाठी भाविकांना द्यावयाचा गुरुप्रसाद आश्रमात तयार करण्यात आला. या संपूर्ण महोत्सवाच्या थेट प्रक्षेपणाची व्यवस्था ध्यानपीठाद्वारे करण्यात आलेली होती.

सर्व भक्त भाविकांना ध्यानपीठाद्वारे निमंत्रित करण्यात आलेले होते. उत्सवासाठी सर्व सत्संग मंडळे व अन्नदात्यांकडून आर्थिक सहाय्य होत असल्याची कृतज्ञ भावे सांगत विश्वस्तांनी त्यांना धन्यवाद दिले. आश्रमातील संत परमानंद महाराज, संत निजानंद महाराज, अन्य संत तसेच अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, विश्वस्त तसेच आश्रमाचे कर्मचारीवृंद आदी सर्वजण व्यवस्था सांभाळत होते.

दि. १८ जुलै २०२४ पासून प्रारंभ झालेल्या या महोत्सवात दैनंदिन कार्यक्रमाअंतर्गत प्रातःकाळची काकड आरती, भजनसेवा, आरती, मौन ध्यान, दुपारच्या सत्रात हरिपाठ, प. पू. सद्‌गुरूंसमवेत मौन ध्यान, सत्संग व आरती यानुसार कार्यक्रमांचे आयोजन व प. पू. सद्‌गुरू माऊलींचे दर्शन यानुसार कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते.

दि. १८ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वाजता आश्रमवासी भजनीमंडळाच्या गीताने सुरुवात झाली. 'जय आत्मदेव, जय आत्मदेव, आत्माही परमात्मा है' या गीतानंतर श्यामसुंदर यांनी 'जन हो आत्मस्वरुपी जागा...' हे भजन व अन्य गिते गायली. गुरुपौर्णिमा कार्यक्रमास उपस्थित सर्व भक्तभाविकांचे संत परमानंद महाराज यांनी स्वागत केले. प. पू सद्‌गुरुंच्या सानिध्यात सर्व संत, उपस्थित विश्वस्त, भक्त भाविक, शिक्षक, सेवकवर्ग या सर्वांचे सकाळच्या सत्रातील मौन ध्यान झाले. या ध्यानादरम्यान ध्वनीफित ऐकविण्यात आली.

**'श्री गुरर्ब्रह्मा, गुरुर्विष्णु, गुरुर्देवो महेश्वरः।**
**गुरु साक्षात् परब्रह्म, तस्मै श्री गुरवे नमः।।'**

श्रीगुरूंचे महत्त्व, तसेच मानवाने आपले मन, चित्त निर्मळ करून मनातील अहंकाराचे निरसन करून ध्यानातून आत्म्याचे आत्मचिंतन करावे.' ध्यानानंतर आत्मदेवाची आरती झाली.

संत परमानंद महाराज यांनी गुरुआज्ञेनुसार महाशिवरात्रीपासून ४० दिवसांचे उपवास व ५ दिवस पाण्यावरील उपवास केलेल्या भाविकांच्या आत्मानुष्ठानाची पूर्तता गुरुपौर्णिमेला होत असल्याचे सांगून श्री गुरुदेवांच्या वतीने सर्व आत्मप्रेमी अनुष्ठानी भाविकांचे अभिनंदन केले. अनुष्ठानाच्या सामुदायिक ध्यानपाठात संत परमानंद महाराज पुढे म्हणाले, प. पू. सद्‌गुरू म्हणतात, जीवनात स्वतःसाठी वेळ दे. ध्यानाद्वारे स्वस्वरूप आत्म्याचे आत्मचिंतन करा, ध्यान करा. श्री गुरुतत्वाचे ध्यान करण्याचा सोहळा म्हणजेच गुरुपौर्णिमा. त्यानंतर प. पू. सद्‌गुरूंच्या वतीने आश्रमातील संत शांतीमाई यांनी विधिवत अनुष्ठानविधीची सद्‌गुरूंच्या कृपाशीर्वादासह पूर्तता केली. आलेल्या भाविकांनी सद्‌गुरुंचे रांगेत दर्शन

केले.

दि. १९ जुलै २०२४ रोजी प्रातःकाळी काकड आरती, भजनसेवा झाली. सकाळच्या सत्रातील मौन ध्यान झाले. श्यामसुंदर व भजनी मंडळाने संत नामदेव महाराज, जगद्गुरू तुकाराम महाराज यांची गुरुमहिमा सांगणारी विठ्ठलाची भजने गायली.

परमानंद महराज यांनी गुरुपौर्णिमा पर्वकाळ हा आध्यात्मिक दृष्टिकोनातून भक्तासाठी दिपावलीसम साजरा होत असल्याचे नमूद केले. ते म्हणाले शाश्वत आनंदाला प्रकट करणारा, प्रत्यक्ष सगुण साकार रुपातील परमात्मा आपल्यात उपस्थित आहे. त्यांनी श्यामसुंदर सुतार हे मागील ४० वर्षांहून अधिक काळ सद्गुरूंच्या भजनसेवेत असल्याचा उल्लेख केला.

गोरंबे येथील आश्रमातील सागर महाराज, हृदयनिवासी संत अमृतानंद महाराज ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य श्री गुरुसेवेत वेचले त्यांना श्रद्धांजली वाहून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले व सामुदायिक ध्यानातून त्यांना श्रद्धांजली वाहिली. तद्नंतर परमानंद महाराज यांनी कोकमठाण येथील हृदयनिवासी बाळासाहेब लोंढे यांनी विश्वात्मक जंगली महाराज आश्रमास कोकमठाण येथील दान दिलेल्या भूमीचा उल्लेख करून त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या या जागेत प. पू. सद्गुरू प्रारंभीच्या कुटीपासून विस्तारीत झालेल्या भव्य सत्संग हॉल, विद्यानिकेतन, अन्नदान कक्ष, भोजनालय, तपोवन व भव्य गुरुकुल वास्तूचे नंदनवन झालेले सांगितले. हृदयनिवासी बाळासाहेब लोंढे यांची गुरुचरणी निस्सीम श्रद्धाभक्ती होती. त्यांच्या स्मृतीस त्यांनी अभिवादन केले. आत्मा मालिक ध्यानपीठाच्या वतीने त्यांचे सुपुत्र महेश बाळासाहेब लोंढे यांचा संत ब्रह्मानंद महाराज यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना गुरुप्रसाद दिला. नारद सरांचे भजन गीत झाले. त्यानंतर आरती पार पडली. सर्व उपस्थितांनी सद्गुरुंचे रांगेतून दर्शन घेतले.

**दि. २० जुलै २०२४ चौदस पर्व आणि गुरुपौर्णिमा**

प्रातःकाळी काकड आरती, भजनसेवा व आरती झाली. सकाळच्या सत्रात संत परमानंद महाराज यांनी गुरुपौर्णिमेस आलेल्या सर्वांचे मनापासून हार्दिक स्वागत केले. सर्व संत, विश्वस्त, सत्संग मंडळ, देश परदेशातून आलेले आत्मप्रेमी भाविक यांना भावपुष्प अर्पण करुन परमानंद महाराज पुढे म्हणाले 'गुरुपौर्णिमा चौदस तिथी ही विशेष आहे. भक्ताचे आत्मिक उत्थान करण्यासाठी प. पू. सद्गुरू आहेत. सद्गुरू महादर्शनाचा दिव्य लाभ यानिमित्ताने सर्वांना होत आहे. गुरुंचा अनुग्रह मिळाल्यापासून गुरुपौर्णिमेस समर्पण भावाने दर्शन करून साधकाला शाश्वत आनंद प्राप्ती होते. श्रीगुरुंच्या प्रातःकालच्या दर्शनाने सर्व धन्य झाले आहेत.'

त्यानंतर सामुदायिक ध्यानपाठ झाला. ध्यानातून प. पू. सद्गुरुंचे आत्मपूजन, सगुण स्वरुपाची पूजा, अंतर्मनाने निर्गुण निराकारापर्यंत पोहचण्यासाठी आत्मध्यानातून करीत आहोत. हे ध्यान, श्रीगुरुपौर्णिमा अंतःकरणातील अंधकार घालवून प्रकाशमान करीत आहे. ध्यानातून सामुदायिक ॐकार ध्वनी उच्चारुन मानस पूजेतून, प. पू. सद्गुरुंचे आत्मपूजन करण्यात आले. ध्यानातून मनाने चरणावर माथा ठेवून श्री गुरुचरणी वंदन केले. आरती झाली. आलेल्या भक्तांनी सद्गुरुंचे रांगेतून दर्शन घेतले. सर्वांनी प्रसाद ग्रहण केला. आलेल्या सर्वांना व्यवस्थित प्रसाद भोजन मिळावे यासाठी भोजनालयातील सर्वजण विश्वस्त बाळासाहेब गोरडे यांच्या देखरेखीत तत्परतेने व्यवस्था सांभाळीत होते. सायंकाळी नायगांवकर आणि भजनी मंडळ यांचा हरिपाठ झाला. सायंकाळी पाच वाजता सद्गुरूंचे सत्संगात आगमन झाले. 'जय आत्मदेव, जय आत्मदेव' भजनगीत झाले. श्याम सुतार आणि नायगांवकर भजनी मंडळाची भजनसेवा झाली. उपस्थित सर्व भाविकांनी टाळ्यांच्या गजरात भजनाचा आनंद घेतला.

संत परमानंद महाराज यांनी उपस्थित सर्वांसाठी आत्मा मालिक ध्यानपीठ, ध्यानयोग मिशनच्या वतीने गुरुपौर्णिमेनिमित्त पर्यावरण रक्षणाच्या अनुषंगाने वर्षभरात आश्रमाच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध जमिनीवर वृक्षारोपण करण्याची घोषणा केली. सर्व भक्तांनाही रोपटे प्रदान करून त्यांच्यामार्फत वृक्षारोपण करण्यास सांगण्यात आले. त्यासाठी गुरुपौर्णिमेच्या पर्वावर २१ हजार आत्मतरुंचे वाटप भाविकांना करण्यात येत असल्याचे सांगून सद्‌गुरुंच्या हस्ते वृक्षावर गंगाजल शिंपून रांगेतील प्रथम ५ भाविकांना वृक्ष वाटप करण्यात आले. आश्रमाचे विश्वस्त तथा पुरणगाव येथील गुरुकुलाचे अध्यक्ष हनुमंत भोंगळे यांनी सादर केलेल्या गुरुकुलाच्या माहितीबाबतच्या विशेषांकाचे प्रकाशन प. पू. सद्‌गुरुंच्या हस्ते करण्यात आले. कारदगा (कनार्टक) येथून आलेल्या कांताभाऊ यांनी नृत्यकला सादर केली. दर्शनरांगेतून भाविकांनी प. पू. सद्‌गुरुंचे दर्शन घेतले. चौदसला रात्री १० वाजता नामदान विधी झाला.

### दि. २१ जुलै २०२४

प्रातःकाळी काकडआरती, भजनसेवा, आरती झाली. सकाळी १० वाजता प. पू. सद्‌गुरुंचे सत्संग हॉलमध्ये आगमन झाले. सर्व संत, अध्यक्ष, विश्वस्त, भाविक, शिक्षक, विद्यार्थी यांचे प. पू. सद्‌गुरुंच्या सान्निध्यात ध्यान झाले. सत्संग, भजनसेवा झाली. दुपारी आत्मदेवाची आरती झाली. तद्‌नंतर दुपारी १२.३० वाजता गुरुपौर्णिमेची प.पू. सद्‌गुरु माऊलींचे संतांकरवी मनोभावे गुरुपूजन करण्यात आले. श्रीगुरुचरणी फुले वाहिली. परमात्म्याच्या निर्गुण निराकाराच्या सगुण स्वरुपाची पूजा झाली. प. पू. सद्‌गुरुंच्या चरणी सर्वांनी समर्पित भक्तिभावाने अंतःकरणपूर्वक वंदन केले. 'सबका मालिक आत्मा' जयघोष झाला. आलेल्या विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या योगदानाबाबत त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. भाविकांनी रांगेतून येऊन सद्‌गुरुंचे दर्शन घेतले. गुरुदेव आपल्या प्रेमळ दृष्टीतून सर्वांवर कृपाप्रेमवर्षाव करीत होते. गुरुपौर्णिमेचा गुरुदर्शनाचा भव्यदिव्य सोहळा चैतन्यमय व आनंददायी होता. दर्शनानंतर सर्वांना प्रसाद भोजनासाठी जाण्याची सूचना देण्यात आली. सायंकाळी ४ वाजता कीर्तनसेवेत नवनाथ अवतार नामगायनासह बालकलाकारांनी नृत्य सादर केले. ह. भ. प. तुकाराम महाराज व सहकारी वारकऱ्यांनी सादर केलेल्या कीर्तनसेवेत संत ज्ञानेश्वरांचा अभंग 'ज्ञानदेव म्हणे भजा आत्मदेवा' निरुपणास घेतला. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात भगवान परमात्म्याचे मूळ रूप आत्मा आहे. ॐ नमोजी आद्या, आत्मरुपी देवा तूच श्री गणेश आहेस. ज्ञानदेव प्रमाण आत्मा हा निधान, सर्वांघटी पूर्ण एक नांदे. परमात्मा आत्मस्वरुपात सर्वत्र व्यापून आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींनी सांगितलेले आत्मतत्त्वाचे ज्ञान व तेच आता सद्‌गुरू आपणास सांगत आहेत. सद्‌गुरुंची भेट आपल्या अनंत जन्माचे पुण्य फळास आले म्हणून होत आहे. कीर्तनात विठ्ठलाची आरती झाली. तद्‌नंतर व्यंकटगिरीहून आलेल्या भक्तांच्या सेवा मंडळाने भजनसेवा सादर केली. प. पू. सद्‌गुरू माऊलींचे दर्शन रांगेतून सर्वजण शांततेत घेत होते. गुरुपौर्णिमेसाठी तन-मन-धनाने योगदान केलेल्या सर्वांचे आत्मा मालिक ध्यानपीठाच्या वतीने आभार मानण्यात आले. अशा प्रकारे गुरुपौर्णिमेचा हा सोहळा चैतन्यमय वातावरणात साजरा झाला.

**संकलक : बी. के. गायकवाड**
प्लॉट क्र. ५,
नवमहाराष्ट्र को. ऑप. हौसिंग सोसायटी,
पुणे-सातारा रोड, पुणे - ०९
मो.नं. - ९४०३०२६१६४

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## मित्रता

मित्रता का रूप हमें हर तरफ़ या रिश्ते में मिल सकता है; वह आपका सहपाठी, सहकर्मी, भाई- बहन, पिता, गुरु या माँ के गर्भ में यह रिश्ता शुरू होता है क्योंकि यहाँ आप पहली अठखेलियाँ शुरू करते है, और इसी में वह प्रसन्नता से भर जाती है, और आप भी अपनी समस्त भावनायें उड़ेल कर उससे सीमित साधनों में भी व्यक्त कर देते हैं यहाँ कुछ भी छिपा हुआ नहीं रहता, यही इस रिश्ते की ख़ासियत है।

**-नीता नरेश यादव**

**सुखद अहसास जीवन में, लगे जब नाचने ख़ुद में।**
**बस समझ लो बस गये तुम, कोई मित्र के रस में ।।**

मित्रता एक ऐसा अहसास है, जो जीवन के बीजारोपण अर्थात् माँ के गर्भ से शुरू होकर अंतिम साँस तक एक ख़ुशी के जुड़ाव के रूप में अनुभवित होता रहता है, यह एक मात्र ऐसा परिवेश है; जिसमें रहने से हमेशा ही सुखद अहसास बना रहता है, इसके विपरीत केवल और केवल मानवता के विरोधी गुणों का ही व्यवस्थापन दिखाई देता है, कभी भी, कहीं भी किसी भी प्रकार से जरा सा भी अहसास जो मित्रता के विरुद्ध सजता है उसमें केवल अशांति का वास है और कुछ भी नहीं।

मित्रता का रूप हमें हर तरफ़ या रिश्ते में मिल सकता है; वह आपका सहपाठी, सहकर्मी, भाई- बहन, पिता, गुरु या जैसा शुरू में कहा गया कि या रिश्ता माँ के गर्भ में शुरू होता है क्योंकि यहाँ आप पहली अठखेलियाँ शुरू करते है, और इसी में वह प्रसन्नता से भर जाती है, और आप भी अपनी समस्त भावनायें उड़ेल कर उससे सीमित साधनों में भी व्यक्त कर देते हैं यहाँ कुछ भी छिपा हुआ नहीं रहता, यही इस रिश्ते की ख़ासियत है, और यह ख़ासियत उपरोक्त रिश्तों में या स्वतंत्र रूप से जहाँ भी उत्पन्न हो जाती है, मित्रता का भाव बन जाता है। यहाँ हमें यह याद रखना ज़रूरी है कि दोस्ती का रिश्ता आत्मा के समान पवित्र है क्योंकि इसमें केवल सच्चाई होती है, इसलिए मित्रता के रिश्ते की कसौटी-गुरु प्रेरणा में लिखे गये इस एक कोट से दर्शित होती है : गौर फ़रमाएँ-

ध्यान रहे मिलावट के इस दौर में हम शुद्धता की पहचान नहीं भूलें, इसे परखना हो तो आत्मा अथवा मित्रता से परखें - आत्मा मालिक .

कहने का मतलब, यह रिश्ता बहुत बड़ी कसौटी पर रखकर बनाया गया है, अतः यह सभी रिश्तों में पाई जा सकती है, हम अपनी बात करें, तो यह हमारे जीवन में प्रथम श्रेणी पर गुरुवर के साथ देखी, जिनकी कृपा में हमें अपनी योग्यता से कई गुना अधिक ऊँचाइयाँ उपलब्ध हैं, सद्गुरु ने हमें ना केवल एक भाविक के रूप में स्वीकार किया बल्कि बहुत कम समय में अत्यधिक सानिध्य दिया या यों कहें कि सद्गुरु हमारे जीवन में पारस की तरह आये और मित्र बनकर हमारे जीवन में सब तरह की ख़ुशियों की

सुगंध बिखेर दी - इस परिपेक्ष्य में हृदय से कुछ पंक्तियाँ निकली - महक आप भी महसूस करें :

**पारस की महक**

**नहीं थी पहचान ख़ुद से भी!**
**भटक रहे थे हम कहीं,**
**अचानक एक मोड़ पर,**
**सरसराहट मिली तूफ़ान की,**
**आपने संभाल लिया,**
**तूफ़ान को भी बना दिया,**
**ताजी हवा का झोंका,**
**सद्गुरू बनके आपने,**
**पहचान दी अपनी, और**
**जीवन को संवार दिया।**
**ध्यान को समझाया ,**
**जीवन का लक्ष्य दिखा दिया,**
**जीवन की हर राह में,**
**आत्मस्वरूप का दीपक जला दिया,**
**एक अनगढ़ को भी आपने,**
**आत्म शिक्षित कर दिया,**
**त्रुटियों को मोड़कर कर,**
**मूर्तिमान बना दिया,**
**आप जैसे पारस से,**
**हम कंकड़ भी स्वर्ण हो गए,**
**जो आप मेरे सद्गुरु हुए,**
**तो हम भी धन्य हो गये,**
**नहीं थी पहचान ख़ुद से भी,**
**फिर भी स्वर्ण हो गए,**
**हम भी धन्य हो गये,**
**हम भी धन्य हो गये ||**

यही धन्यता हमारे उन मित्रों के साथ दिखाई पड़ती जो हमारे सांसारिक जीवन को आनंद से भरकर बैलेंस बनाये हुए है इसलिए उनके लिए भी लिखा गया है कृपया इस पर भी ग़ौर फ़रमाएँ -

**साथ**

**मित्र, थामकर यूं ही एक दूसरे का हाथ,**
**चलते रहें जिंदगी के सफर में,**

मित्रता की इस वर्षगांठ पर
आज चलो फिर से ऐसा प्रण कर लें।
विश्वास के इस बंधन में,
न आए कभी कोई दरार,
हालात चाहे जैसे भी हो
परवान चढ़ता रहे हमारा आत्मा सा शुद्ध प्यार।
कितने जन्म फेरों से बना ये रिश्ता,
हर जन्म  मजबूत होता रहे,
फ़रिश्ते बने रहो मित्र मेरी जिन्दगी के,
साथ तुम्हारा मुझे हमेशा मिलता रहे,
तुमसे ही जाना मैंने इश्क क्या है,
क्या है प्यार, मोहब्बत और वफादारी,
रूठते मनाते एक दूसरे को यूं ही हम निभा ले,
अपनी ये प्यारी सी यारी,
हर जन्म में बनी रहे, मित्रों से मित्रता हमारी,
हम रहे या ना रहे, मित्रता बनी रहे हमारी,
मित्रता बनी रहे हमारी ।।

अभी ३०, जुलाई २०२४ को अंतर्राष्ट्रीय मित्रता दिवस मनाया गया। साथ ही हमारे देश में अगस्त के पहले रविवार को इस दिवस को मित्रों को समर्पित करने का दिन है, अत : इस अवसर पर हमारे समस्त आत्मीय मित्रों समस्त गुरु भाई-बहनों और संतजनों को हमारी ओर से बहुत बहुत हार्दिक हार्दिक सुभकामनाएँ ।

।। आत्मा मालिक ।।

- नीता नरेश यादव,
आत्मा मालिक परिवार, इंदौर

***

# आत्मा मालिक गुरुपौर्णिमा महोत्सवाची क्षणचित्रे...



*** प्रेषक ***

**संपादक, मासिक ॐ गुरुदेव**

**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,**

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगांव रोड,

ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)-४२३६०१